# ::: प्र स्ता व ना :::
======0=====

सातारा जिल्हयात बहुजन समाजाचे नेते म्हणून, बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्व सन १९३७ च्या दरम्यान उदयास आले. शैक्षणिक, सामाजिक, व धार्मीक क्रांती कोल्हापूरच्या ज्या राजर्षी शाहू महाराजांनी घडवली, त्या राजर्षी शाहूंच्या विचाराने भारलेल्या कोल्हापूरमध्ये घडवलेले एक विचारनिष्ठ व्यक्तिमत्व म्हणजे बाळासाहेब देसाई होय. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज यांचे आदर्श, व त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून बाळासाहेब देसाई यांनी सातारा जिल्हयात सामाजिक कार्याचे तोरण बांधले.

बाळासाहेब देसाई ग्रामीण भागातून आले होते. त्यांच्या कर्तबगारीमुळे बहुजन समाजाचे नेते म्हणून त्यांचा उदय झाला आणि ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व विविध खात्याचे मंत्री झाले.

बाळासाहेब देसाई यांचा राजकारणात मोठा प्रभाव होता. त्यांनी आपल्याकडे असणा-या राजकारणातील प्रभावाचा उपयोग बहुजन समाजाची सेवा करण्यासाठी केला. व आपले आयुष्य गरीबांच्या, शेतक-यांच्या व कष्टक-यांच्या उन्नतीसाठी व्यतीत केले. सा-या महाराष्ट्राचे जीवनदात्री व शक्तीदात्री ठरलेले कोयना धरण बाळासाहेबांच्या अविश्रांत परिश्रमुळे पूर्ण झाले. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया मागासलेल्या पालकांच्या मुलांची शिक्षणाची मोफत सोय(ई.बी.सी. सवलत) करणारे क्रांतीकारक निर्णय बाळासाहेबांचेच आहेत. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, कृषि महाविद्यालय कोल्हापूर, मुंबई -गोवा हमरस्ता, धरमतरचा पुल, शेतकी पदवीधर व अधिका-यांच्या वेतनात वाढ, कोयना भूकंपग्रस्तांचे पुर्नवसन, मरळी ता. पाटण येथील बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना इत्यादी प्रमुख व भरीव कामांची उभारणी बाळासाहेबांच्यामुळे झाली आहे, हे कार्य महाराष्ट्र कधीही विसरु शकत नाही.

त्यांच्या या प्रचंड कार्यामुळे व बहुजन समाजाची उन्नती होण्यासाठी

... ...

त्यांनी केलेल्या धडपडीमुळे महाराष्ट्रातील जनता त्यांना " लोकनेता" म्हणून ओळखते.

अशा या लोकनेत्याची व त्यांच्या प्रचंड कार्याची ओळख व्हावी व दुलक्षिले गेलेले हे प्रभावी व्यक्तिमत्व उजेडात यावे व त्यांच्या शैक्षणिक ऋणातून थोडया फार प्रमाणात उतराई होण्यासाठी बाळासाहेबांच्या जीवन कार्याचा आढावा घेण्याचा याठिकाणी मी प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुंबई येथील विधानभवनाच्या ग्रंथालयामधील मुंबई व महाराष्ट्र राज्य विधानसभेची डिबेटस् इत्यादी अस्सल कागदपत्रांच्या आधारे त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणेचा प्रयत्न केला आहे. प्रकाशित दुय्यम साधने, स्मरणिका, मानअंक, यांचा आवश्यक ठिकाणी उपयोग केला आहे. माजी आमदार, संपादक, पत्रकार निवृत्त शिक्षणाधिकारी, पोलिस अधिकारी इत्यादी बाळासाहेबांच्या समकालीन लोकांच्या मुलाखती घेवून सत्यतापाहण्याचा पडताळा केला आहे. त्यांच्या कर्तबगारी विषयीची माहिती मिळविण्यासाठी सन १९४१ ते १९८३ पर्यंतची काही वृत्तपत्रे बारकाईने पाहून त्या माहितीचा योग्य ठिकाणी उपयोग केला आहे. त्याचप्रमाणे बाळासाहेबांच्या हस्ताक्षरातील काही पत्रे व बाळासाहेबांच्या विचाराचे संग्रह इत्यादीमाहितींचा वापर करून शोधप्रबंध पूर्ण केलेला आहे.

या संशोधन कार्यात अनेक लोकाचे सहकार्य व प्रोत्साहान मिळाले म्हणून त्याचे आभार मानेनेमी माझे कर्तव्य समजतो. सुरुवातीस या संशोधन प्रबंधाच्या कार्यात मला वेळोवेळी माझे मार्गदर्शक डॉ. बी.डी. खणे याचे सहकार्य मिळाले म्हणून मी हे काम वेळेत पूर्ण करु शकलो म्हणूनच मी त्यांचा अभारी आहे.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर या संस्थेचे सचिव, प्राचार्य अभयकुमार साळुंखे व सहळमावले ता. पाटण येथील काकासाहेब चव्हाण कॉलेजचे प्राचार्य पुरुषोत्तम शेठ यांनी मला एम्.फील साठी एक वर्ष

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

...

डेप्युटेशनवर पाठवले. त्यांनी मला दिलेली हि फार मोठी, संधी व त्याचे सहकार्य याबददल मी त्यांचा ऋणी आहे त्याचप्रमाणे मुंबई, विधान भवन ग्रंथालयाचे असिस्टंट ग्रंथपाल श्री वाघमारे, एस्. जी. एस. कालेजचे ग्रंथपाल श्री जाधव ग्रंथपाल सहायक श्री थोरात एस्. बी. काकासाहेब चव्हाण कालेजचे ग्रंथपाल श्री जगताप एस्. ई. यांच्या सहकार्याबददल मी त्यांचा अभारी आहे.

हा शोधप्रबंध तयार करण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक व माजी आमदार श्री बाबूराव कोतवाल यांनी अतिशय महत्वपूर्ण माहिती दिली त्याबददल त्यांचा मी मनपूर्वक ऋणी आहे.

त्याचप्रमाणे बाळासाहेब देसाई यांचे सुपुत्र श्री अशोकराव देसाई व बाळासाहेबांचे नातू, बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखानाचे चेअरमन श्री शंभुराजे देसाई यांनी मला माहिती मिळवून देण्यासाठी फार मोठी मदत केली त्यांचा मी अभारी आहे.

निवृत्त शिक्षणाधिकारी के. जी. सुर्यवंशी, बाळासाहेबांचे चुलतबंधू श्री भागवतराव देसाई यांनी तोंडी व लेखी स्वरूपात महत्वाची माहिती दिली त्याचप्रमाणे स्वातंत्र्य सैनिक व कॉम्रेड राजाराम बापू पाटील या सर्वांच्या सहकार्याबददल मी अभारी आहे .

संशोधनाच्या कामासाठी मला दैनिक ग्रामोध्दार सातारचे संपादक श्री आर. बी. जाधव व बापूसाहेब जाधव , साप्ताहिक धूमकेतू कोल्हापूरचे संपादक श्री राजाभाऊ जोशी, दै. पुढारीचे संपादक श्री जाधव, निवृत्त डी. वाय्. एस्. पी. श्री बी. ए. साबरे माजी आमदार श्री आबासाहेब पार्लेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ आर. एल. साबडे, पत्रकार कर्मी बा. सु. देशपांडे, दै. समाज कोल्हापूरचे संपादक श्री बापूसाहेब कावते, दै. तरुण भारत कार्यालय कोल्हापूर येथील ऑफीस इनचार्ज श्री देशपांडे हिंदकेसरी श्री गणपतराव आंदळकर व श्रीपती खंचनाळे, पाटण खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन श्री गणपती भाऊ देसाई इत्यादींच्या सहकार्याबददल

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

... ...

मी आभारी आहे.

तसेच माझी आजी, आई व वडिल स्वातंत्र्यसैनिक श्री गोपाळराव पांडूरंग थोरात, व माझी पत्नी प्रा. सौ. शोभा आत्माराम थोरात, सायन्स कॉलेज कराड, तसेच सौ. कमल हिंदूराव पाटील निवृत मुख्याध्यापिका इत्यादींचे मला वेळोवेळी प्रोत्साहान मिळाले म्हणून मी त्यांचाही अभारी आहे.

वाल्मिकी विद्यामंदिर तळमावले, शाखेचे मुख्याध्यापक श्री. कुंभार एस्. के. यांनी टंकलेखनासाठी टाईपरायटर वेळोवेळी उपलब्ध करुन दिला त्यांच्या या सहकार्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. माझे जेष्ठ सहकारी प्रा. कुर्लेकर, व श्री. शेवाळे एस्. बी. व उपशिक्षक वाल्मिकी विद्यामंदिर तळमावले यांच्या सहकार्याबददल मी त्यांचा अभारी आहे.

लिखाण कामात मला श्री. श्रीकांत पाटील व श्री. केशव कचरे यांनी मदत केली. त्यांचाही मी अभारी आहे.

शेवटी श्री. यशश्री टायपिंग सेंटर कोल्हापूर व श्री. अशोक शिंदे यांनी मला वेळेत अंकलेखन करुन दिले म्हणून मी त्यांचा अभारी आहे. प्रा. नंदकुमार शिंदे यांनी मला वेळेत झेरॉक्सिंग करुन दिले त्याबददल मी त्यांचा अभारी आहे.

या प्रबंधात व्यक्त केलेल्या मतांशी मी वैयक्तिक जबाबदार आहे व जर काही नजर चुकीने चुका राहिल्या असल्यास त्यालाही मी जबाबदार आहे.

कोल्हापूर.

३०-११-१९९०.

श्री. थोरात अ. जी.

------------ 0 ------------